माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/२०२२/अपील/०८/२०२२/०४९४ दिनांक-२१.१०.२०२२

| | |
|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | :१५.०७.२०२२ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | :१२.०८.२०२२ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | :१२.०९.२०२२ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | :२१.१०.२०२२ |

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

**अपील क्र. ०८/२०२२**

**अपीलकर्ता:** श्रीमती हेमलता प्रमोद मोती

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपीलाचे तथ्य :-**

१) अपीलकर्ता यांनी दिनांक १५.०७.२०२२ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक १५.०७.२०२२ रोजी प्राप्त झाला. अपीलार्थी यांच्या दिनांक १५.०७.२०२२ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक माहिती न पुरविल्यामुळे अपीलार्थी यांनी दिनांक १२.०९.२०२२ रोजी वरील अपील दाखल केले. (प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक १२.०९.२०२२ रोजी प्राप्त झाले.)

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक १९.०९.२०२२ रोजी नोटिस पाठवून दिनांक २८.०९.२०२२ रोजी सुनावणी आयोजीत केली. सुनावणी च्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोन्ही हजर होते. अपिलार्थी यांनी लेखी तसेच मौखिक व माहिती अधिकारी यांनी मौखिक निवेदन सादर केले.


१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in **Website :** www.merc.gov.in

३) अपिलातील दस्तऐवज व निवेदनावरुन अपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहेत -

<u>मागितलेली माहिती:-</u>

i. आयोगाच्या कार्यालयातील अवर सचिव यांनी श्रीमती हेमलता मोती यांच्या सेवे विषयक दिलेले तक्रार अर्ज तथा माहिती अधिकार अर्ज, अपील अर्ज आणि अपील अर्जावर केलेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती.
ii. अवर सचिव यांनी दि. ०९.०५.२०२२ आणि दि. १२.०५.२०२२ रोजी कार्यालयामध्ये दिलेल्या अर्जावर कार्यालयामध्ये सादर केल्लेल्या नस्तीच्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती.

<u>जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-</u>

माहिती अधिकार अर्ज दिनांक १५.०७.२०२२ मध्ये मागीतलेल्या माहितीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर-

<u>वरिल मुद्दा क्रमांक (i) ला दिलेले उत्तर</u> :-

अ) अवर सचिव यांनी श्रीमती हेमलता मोती यांच्या सेवे विषयक दिलेले तक्रार अर्ज- आपण मागितलेली माहिती ही कार्यालयाच्या अभिलेख कक्षामध्ये उपलब्ध असलेल्या एकूण चार नस्तीमध्ये नसल्याचे दिसून येत आहे.

ब) अवर सचिव यांनी श्रीमती हेमलता मोती यांच्या सेवे विषयक दिलेले माहिती अधिकार अर्ज- माहिती अधिकार अर्ज सोबत जोडला असून त्यावर केलेली कार्यवाही महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या <u>www.merc.gov.in</u> (RTI→RTI Replies) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

क) अवर सचिव यांनी श्रीमती हेमलता माती यांच्या सेवेविषयक दिलेले अपील अर्ज आणि अपील अर्जावर केलेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती- अपील अर्ज सोबत जोडला असून त्यावर केलेली कार्यवाही महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या <u>www.merc.gov.in</u> (RTI→RTI Replies) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

<u>वरिल मुद्दा क्रमांक (ii) ला दिलेले उत्तर</u> :-

अ) अवर सचिव यांनी दि. ०९.०५.२०२२ रोजी कार्यालयामध्ये दिलेल्या अर्जावर कार्यालयामध्ये सादर केलेल्या नस्तीच्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती- सदर अर्जाच्या अनुषंगाने नस्ती सादर केलेली असून सदर नस्ती पुन्हा प्रशासन विभागाकडे अद्याप आलेली नाही. त्यामुळे याबाबतची माहिती सद्यस्थितीत उपलब्ध नाही.
ब) अवर सचिव यांनी दि. १२.०५.२०२२ रोजी कार्यालयामध्ये दिलेल्या अर्जावर कार्यालयामध्ये सादर केलेल्या नस्तीच्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती- सदर अर्ज संबंधित कक्ष अधिकारी यांच्याकडे वर्ग केलेला नसल्यामुळे याबाबतची माहिती देखील सद्यस्थितीत उपलब्ध नाही.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-**

1. मी दि.१५.०७.२०२२ रोजी आयोगाच्या कार्यालयात माहिती अधिकार सादर केला होता. सदर माहिती अधिकाराचे अपूर्ण उत्तर दि. १३.०८.२०२२ रोजी प्राप्त झालेले आहे.
2. माहिती अधिकार अर्जामध्ये मुद्दा क्र. १ आणि २ मधील श्रीमती हेमलता मोती यांच्या सेवे विषयक, इतर कामकाजाबाबत तथा CGRF च्या कामकाजावर घेतलेल्या आक्षेपाबाबत दिलेले तक्रार अजा विषयकचे कागदपत्र दिलेले नाहीत.
3. माहिती अधिकारामधील मुद्दा क्र. २ ची माहिती उद्याप दिलेली नसून माहिती अधिकाराच्या उत्तरामध्ये कार्यालयांतर्गत कार्यवाहीबाबतची माहिती उदधृत केलेली आहे. प्रत्यक्षामध्ये संबंधित कागदपत्रे मला दिलेली नाहीत.
4. जन माहिती अधिकारी यांनी जाणूनबुजून चुकीची अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीनुसार २० (१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्यावर कार्यवाही व्हावी.
5. वरील नमूद माहिती अपील अर्जान्वये मिळावी. वरील नमूद माहिती साक्षांकित प्रतीमध्ये विहित वेळेत मिळावी.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-**

१. अपिलार्थी यांना मुद्दा (ब) या संबंधाने माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करून दिलेली आहे.
मुद्दा क्र. (अ) अवर सचिव यांनी श्रीमती हेमलता माती यांच्या सेवे विषयक दिलेले तक्रार अर्ज यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली आहे. माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अपिलार्थी यांनी काय कार्यवाही केली असल्याचे विचारले आहे. (What action taken.) करीता कार्यवाही काय केले या बद्दल माहिती देण्यास बाध्य नाही. त्यांच्या तक्रार अर्जाची प्रत त्यांना देवू शकतात.

*CIC Judgement:-*

The Hon'ble CIC in the matter of *Shri Madan lal Aswal and Dal Chand Vs. CPIO Municipal Corporation Delhi* (Decision dated 05.11.2008) held that *"The respondent has replied to the query about the ownership of the land and the responsibility of maintenance ………….. The appellant now wants to know why action of demolition has not been taken, before allotment which according to him was precondition. Though the respondents are well intentioned, reasons for actions or inaction of public authorities cannot be obtained unless they have been recorded by the public authority. The PIO cannot be expected to provide reasons unless they are recorded."*

२. मुद्दा क्र. २ मध्ये अपिलार्थी यांनी अवर सचिव यांना दि.०९.०५.२०२२ अणि १२.०५.२०२२ रोजी कार्यालयामध्ये दिलेल्या अर्जावर कार्यालयामध्ये सादर केलेल्या नस्तीच्या कार्यवाहीची संपूर्ण माहिति मागीतलेली आहे. सदरहू माहिती, अपिलार्थी यांना या निर्णयांच्या १५ दिवसाच्या आत माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून द्यावी.

अपील अंशत: मान्य करून निकाली काढण्यात येत आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी हे वैद्यकिय रजेवर असल्यामुळे सदरहू अपिल ४५ दिवसाच्या मुदतीच्या आत निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

<u>निर्णय</u>

अपील अंशत: मान्य करून निकाली काढण्यात येत आहे.

मुद्दा क्र. २ मध्ये अपिलार्थी यांनी अवर सचिव यांना दि.०९.०५.२०२२ अणि १२.०५.२०२२ रोजी कार्यालयामध्ये दिलेल्या अर्जावर कार्यालयामध्ये सादर केलेल्या नस्तीच्या कार्यवाहीची संपूर्ण माहिति मागीतलेली आहे. सदरहू माहिती, अपिलार्थी यांना या निर्णयांच्या १५ दिवसाच्या आत माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून द्यावी.

**(अनिलकुमार उके)**
**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**

प्रति,
श्रीमती हेमलता प्रमोद मोती,
ब-१३८/६, वांद्रे शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
मो.नं.९७७३९९४४४२.

**(अनिलकुमार उके)**
**संचालक विधी (प्रभारी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**